“गोड मुलांनो - तुम्हाला एका बाबांचेच ऐकायचे आहे आणि ऐकून दुसऱ्यांना ऐकवायचे आहे”

प्रश्नः- बाबांनी तुम्हा मुलांना कोणती समज दिली (ज्ञान दिले) आहे, जे दुसऱ्यांना ऐकवायचे आहे?

उत्तरः- बाबांनी तुम्हाला ज्ञान दिले आहे की, तुम्ही सर्व आत्मे भाऊ-भाऊ आहात. तुम्हाला एका बाबांच्या आठवणीत रहायचे आहे. हीच गोष्ट तुम्ही सर्वांना सांगा कारण तुम्हाला संपूर्ण विश्वातील भावांचे कल्याण करायचे आहे. तुम्हीच या सेवेचे निमित्त आहात.

ओम् शांती. नेहमीच ‘ओम् शांती’ का म्हटले जाते? हे आहे परिचय देणे - आत्म्याचा परिचय आत्माच देते. संवाद आत्माच करते शरीराद्वारे. आत्म्याशिवाय तर शरीर काहीही करू शकत नाही. तर आत्मा हा आपला परिचय देते. आपण आत्मे परमपिता परमात्म्याची संतान आहोत. ते (दुनियावाले) तर म्हणतात - ‘अहम् आत्मा सो परमात्मा’. तुम्हा मुलांना या सर्व गोष्टी समजावून सांगितल्या जातात. बाबा तर ‘बाळांनो-बाळांनो’ असेच म्हणणार ना. रुहानी बाबा म्हणतात - माझ्या रूहानी मुलांनो, या ऑर्गन्स द्वारा (कर्मेंद्रियांद्वारे) तुम्ही समजता. बाबा समजावून सांगत आहेत सर्वप्रथम आहे ज्ञान मग आहे भक्ती. असे नाही की आधी भक्ती नंतर ज्ञान. पहिले आहे ज्ञान अर्थात दिवस, भक्ती आहे रात्र. नंतर मग पुन्हा दिवस कसा येईल? जेव्हा भक्तीचे वैराग्य असेल. तुमच्या बुद्धीमध्ये हे राहिले पाहिजे. ज्ञान आणि विज्ञान आहे ना. आता तुम्ही ज्ञानाविषयीचे शिक्षण घेत आहात. मग सतयुग-त्रेतामध्ये तुम्हाला ज्ञानाचे प्रारब्ध मिळते. ज्ञान बाबा आता देतात ज्याचे प्रारब्ध मग सतयुगामध्ये असणार. या समजून घेण्याच्या गोष्टी आहेत ना. आता बाबा तुम्हाला ज्ञान देत आहेत. तुम्ही जाणता नंतर मग आम्ही ज्ञानापासून परे विज्ञान आपल्या घरी शांती-धाममध्ये जाणार. त्याला ना ज्ञान, ना भक्ती म्हणता येणार. त्याला म्हटले जाते विज्ञान. ज्ञानापासून दूर शांतीधाम मध्ये निघून जातो. हे सर्व ज्ञान लक्षात ठेवायचे आहे. बाबा ज्ञान देत आहेत - कशासाठी? भविष्य नवीन दुनियेकरिता देत आहेत. नविन दुनियेमध्ये जाणार परंतु त्या आधी आपल्या घरी जरूर जाणार. मुक्तिधाममध्ये जायचे आहे. जिथले सर्व आत्मे रहिवासी आहेत तिथे तर नक्कीच जाणार ना. या सर्व नवीन-नवीन गोष्टी तुम्हीच ऐकता, दुसरे कोणी समजू सुद्धा शकणार नाही. तुम्हाला समजते, आपण आत्मे स्पिरिच्युअल फादरची (अध्यात्मिक पित्याची) अध्यात्मिक मुले आहोत. रुहानी मुलांना जरूर रुहानी पिता पाहिजे. रुहानी बाबा आणि रूहानी मुले. रुहानी मुलांचे एकच रुहानी बाबा आहेत. तेच येऊन नॉलेज देतात. बाबा कसे येतात - ते देखील समजावून सांगितले आहे. बाबा म्हणतात - ‘मला देखील प्रकृती धारण करावी लागते’. आता तुम्हाला बाबांकडून खूप काही ऐकायचे आहे. बाबांव्यतिरिक्त इतर कोणाकडूनही ऐकायचे नाहीये. मुले ऐकून मग दुसऱ्या भावांना ऐकवतात. काही ना काही जरूर ऐकवतात. स्वतःला आत्मा समजा, बाबांची आठवण करा कारण तेच पतित-पावन आहेत. बुद्धी तिथे (परमधाम मध्ये) निघून जाते. मुलांना समजावून सांगितले तर ते समजतात कारण आधी अज्ञानी होते. भक्ती मार्गामध्ये अज्ञानामुळे रावणाच्या तावडीत सापडल्याने काय करतात! कसे घाणेरडे बनून जातात! दारू पिल्याने काय बनतात. दारू घाणीला अजूनच पसरवते. आता तुम्हा मुलांच्या बुद्धीमध्ये आहे की बेहदच्या बाबांकडून आम्हाला वारसा घ्यायचा आहे. कल्प-कल्प घेत आलो आहोत त्यामुळे दैवी गुण देखील जरूर धारण करायचे आहेत. श्रीकृष्णाच्या दैवी गुणांची किती महिमा आहे. वैकुंठाचा मालक किती गोड आहे. आता काही श्रीकृष्णाचे घराणे म्हणणार नाही. घराणे तर विष्णूचे अथवा लक्ष्मी-नारायणाचे म्हणणार. आता तुम्हा मुलांना माहित आहे की, बाबाच सतयुगी राज्याचे घराणे स्थापन करतात. ही चित्रे इत्यादी भले नसली जरी तरीही तुम्ही समजावून सांगू शकता. मंदिरे तर खूप बनत राहतात; ज्यांच्यामध्ये ज्ञान आहे ते दुसऱ्यांचे देखील कल्याण करण्यासाठी, आप समान बनविण्यासाठी पळत राहतील. स्वतःला पहायचे आहे की, मी किती जणांना ज्ञान ऐकवले आहे! काही जणांना तर लगेच ज्ञानाचा तीर लागतो. भीष्म पितामह इत्यादींनी देखील म्हटले आहे ना - ‘आम्हाला कुमारींनी ज्ञानाचे बाण मारले. हे सर्व पवित्र कुमार-कुमारी आहेत अर्थात मुले आहेत. तुम्ही सर्व मुले आहात म्हणून म्हणता - आम्ही ब्रह्माची मुले कुमार-कुमारी भाऊ-बहिणी आहोत. हे पवित्र नाते असते. ती देखील दत्तक मुले आहेत. बाबांनी दत्तक घेतले आहे. शिवबाबांनी दत्तक घेतले आहे प्रजापिता ब्रह्मा द्वारे. वास्तविक ‘दत्तक’ शब्द देखील म्हणता येणार नाही.

शिवबाबांची मुले तर आहातच. सर्वजण मला बोलावतात - शिवबाबा, शिवबाबा या. परंतु समज काहीच नाही आहे. सर्व आत्मे शरीर धारण करून पार्ट बजावतात. तर शिवबाबा देखील जरूर शरीराद्वारेच पार्ट बजावतील ना. शिवबाबांनी पार्ट बजावला नाही मग तर काहीच कामाचे नाहीत. किंमतच राहिली नसती. त्यांची किंमत तेव्हाच असते जेव्हा संपूर्ण दुनियेला सद्गतीमध्ये घेऊन जातात; म्हणूनच तर त्यांची महिमा भक्ती मार्गामध्ये गातात. सद्गती होते त्यानंतर मग बाबांची आठवण करण्याची आवश्यकताच राहत नाही. ते (दुनियावाले) फक्त गॉडफादर म्हणतात त्यामुळे मग टीचरच गायब होतो (टीचरचे कार्य दिसून येत नाही). केवळ म्हणण्यापुरते नाव राहते की, 'शिवबाबा परमपिता परमात्मा पावन बनविणारे आहेत'. ते सद्गती करणारे आहेत असे सुद्धा म्हणत नाहीत. भले गायन करण्यामध्ये येते की, 'सर्वांचा सद्गती दाता एकच आहे'. परंतु अर्था शिवाय बोलतात. आता तुम्ही जे काही बोलता ते अर्थासहित बोलता. तुम्ही समजता भक्तीची रात्र वेगळी आहे, ज्ञानाचा दिवस वेगळा. दिवसाचा देखील आपला वेळ असतो. भक्तीचा देखील आपला वेळ असतो. ही बेहदची गोष्ट आहे. तुम्हा मुलांना ज्ञान मिळाले आहे बेहदचे. अर्धा कल्प आहे दिवस, अर्धा कल्प आहे रात्र. बाबा म्हणतात मी देखील येतो रात्रीला दिवस बनविण्याकरिता.

तुम्ही जाणता अर्धा कल्प आहे रावणाचे राज्य, त्यामध्ये अनेक प्रकारचे दुःख आहे; मग बाबा नवीन दुनिया स्थापन करतात त्यामध्ये तर सुखच सुख मिळते. म्हटले देखील जाते हा सुख-दुःखाचा खेळ आहे. सुख अर्थात राम, दुःख अर्थात रावण. रावणावर विजय प्राप्त करता तर मग रामराज्य येते, मग अर्ध्या कल्पानंतर रावण, राम राज्यावर विजय प्राप्त करून राज्य करतो. तुम्ही आता मायेवर विजय प्राप्त करता. अगदी शब्द न् शब्द तुम्ही अर्थासहित सांगता. ही तुमची आहे ईश्वरीय भाषा; ही कोणाला समजणार थोडीच. ईश्वर कसे बोलतात. तुम्ही जाणत आहात ही गॉडफादरची (शिवबाबांची) भाषा आहे कारण गॉडफादर नॉलेजफुल आहेत. गायले देखील जाते - ते ज्ञानाचा सागर नॉलेजफुल आहेत तर जरूर कोणाला तरी ज्ञान देतील ना. आता तुम्ही समजता की, बाबा कसे ज्ञान देतात. स्वतःची सुद्धा ओळख देतात आणि सृष्टीचक्राचे सुद्धा ज्ञान देतात. जे ज्ञान प्राप्त केल्याने आपण चक्रवर्ती राजा बनतो. स्वदर्शन चक्र आहे ना. आठवण केल्याने आमची पापे भस्म होतात. हे आहे तुमचे आठवणीचे अहिंसक चक्र. ते चक्र (सुदर्शन चक्र) आहे हिंसक, शीर धडापासून वेगळे करण्याचे. ते अज्ञानी मनुष्य एकमेकांचे मुंडके उडवत असतात. तुम्ही या स्वदर्शन चक्राला जाणल्यामुळे बादशाही प्राप्त करता. काम महाशत्रू आहे, ज्यामुळे आदि, मध्य, अंत दुःख मिळते. ते आहे दुःखाचे चक्र. तुम्हाला बाबा या चक्राचे ज्ञान समजावून सांगतात. स्वदर्शन चक्रधारी बनवतात. शास्त्रांमध्ये तर किती साऱ्या कहाण्या बनवल्या आहेत. तुम्हाला आता ते सर्व विसरून जायचे आहे. फक्त एका बाबांची आठवण करायची आहे कारण बाबांकडूनच स्वर्गाचा वारसा घेणार. बाबांची आठवण करायची आहे आणि वारसा घ्यायचा आहे. किती सोपे आहे. बेहदचे बाबा नवीन दुनिया स्थापन करत आहेत तर वारसा घेण्यासाठीच तर आठवण करत आहात. हे आहे मनमनाभव, मध्याजी भव. बाबांची आणि वारशाची आठवण करत असताना, मुलांचा आनंदाचा पारा चढलेला असला पाहिजे. आम्ही बेहदच्या बाबांची मुले आहोत. बाबा स्वर्गाची स्थापना करत आहेत, आम्ही मालक होतो, पुन्हा जरूर बनणार आहोत. मग तुम्हीच नरकवासी बनले आहात. सतोप्रधान होता, आता तमोप्रधान बनले आहात. भक्तीमार्गामध्ये देखील आम्हीच आलो आहोत. ऑलराऊंड फेरी मारली आहे. आम्हीच भारतवासी सूर्यवंशी होतो मग चंद्रवंशी, वैश्यवंशी… बनून खाली घसरलो आहोत (अधोगती झाली आहे). आपण भारतवासी देवी-देवता होतो मग आम्हीच खाली घसरलो आहोत. तुम्हाला आता सर्वकाही माहित होते. वाम मार्गामध्ये जातात तेव्हा किती घाणेरडे बनतात. मंदिरांमध्ये देखील अशी घाणेरडी चित्रे बनवलेली आहेत. सुरुवातीला घड्याळे देखील अशा चित्रांची बनवत असत. आता तुम्ही समजता आपण किती गुल-गुल (फूल) होतो मग आम्हीच पुनर्जन्म घेत-घेत किती घाणेरडे बनतो. हे (लक्ष्मी-नारायण) सतयुगाचे मालक होते तेव्हा दैवी गुणवाले मनुष्य होते. आता आसुरी गुणवाले बनले आहेत दुसरा कोणता फरक नाही. शेपटीवाले किंवा सोंडवाले मनुष्य असत नाहीत. देवतांच्या या फक्त निशाण्या आहेत. बाकी स्वर्ग तर प्रायःलोप झाला आहे; ही चित्रे फक्त निशाणी म्हणून राहिली आहेत. चंद्रवंशींची सुद्धा निशाणी आहे. आता तुम्ही मायेवर विजय प्राप्त करण्यासाठी युद्ध करत आहात. युद्ध करता-करता नापास होतात तर मग त्यांची निशाणी धनुष्यबाण आहे. भारतवासी वास्तविक आहेतच देवी-देवता घराण्याचे. नाहीतर कुठल्या घराण्यामध्ये गणले जाणार. परंतु भारतवासीयांना आपल्या घराण्याविषयी ज्ञान नसल्यामुळे स्वतःला हिंदू म्हणतात. नाहीतर वास्तविक तुमचे घराणे एकच आहे. भारतामध्ये सर्वजण देवता घराण्याचे आहेत, जे घराणे बेहदचे बाबा स्थापन करतात. भारताचे शास्त्र देखील एकच आहे. दैवी घराण्याची स्थापना होते, मग त्यामध्ये

वेगवेगळ्या शाखा (धर्म-पंथ) तयार होतात. बाबा स्थापन करतात देवी-देवता धर्म. मुख्य चार धर्म आहेत. फाउंडेशन तर देवी-देवता धर्माचेच आहे. सर्व मुक्तिधामचे रहिवासी आहेत. नंतर मग तुम्ही आपल्या देवतांच्या शाखेमध्ये (धर्मामध्ये) निघून जाल. भारताची सीमा रेषा एकच आहे दुसऱ्या कोणत्याही धर्माची नाहीये. हे आहेत खरेतर देवता धर्माचे. त्यांच्या मधून मग ड्रामा प्लॅन अनुसार दुसरे धर्म निघाले आहेत. भारताचा खरा धर्म आहेच मुळी देवी-देवता धर्म, जो स्थापन करणारे देखील बाबा आहेत. मग नवीन-नवीन पाने निघतात (इतर नवीन धर्म उदयास येतात). हे संपूर्ण ईश्वरीय झाड आहे. बाबा म्हणतात - 'मी या झाडाचे बीज रूप आहे'. हे (देवी-देवता धर्म) फाउंडेशन आहे, त्यामधून मग ट्यूब (शाखा) निघतात. मुख्य गोष्ट आहेच मुळी आपण सर्व आत्मे भाऊ-भाऊ आहोत. सर्व आत्म्यांचे पिता एकच आहेत, सर्वजण त्यांचीच आठवण करतात. आता बाबा म्हणतात या डोळ्यांनी तुम्ही जे काही पाहता ते विसरून जायचे आहे. हे आहे बेहदचे वैराग्य, त्यांचे (दुनियावाल्यांचे) आहे हदचे. फक्त घरादाराचे वैराग्य येते. तुम्हाला तर या संपूर्ण जुन्या दुनियेचे वैराग्य आहे. भक्ती नंतर आहे वैराग्य जुन्या दुनियेचे. मग आम्ही नवीन दुनियेमध्ये जाणार व्हाया शांतीधाम. बाबा देखील म्हणतात - ही जुनी दुनिया भस्म होणार आहे. या जुन्या दुनियेवर आता मन लावायचे नाही. जोपर्यंत लायक बनत नाही तोपर्यंत रहायचे तर इथेच आहे. सर्व हिशोब चुकते करायचे आहेत.

तुम्ही अर्ध्या कल्पाकरिता सुख जमा करता. त्याचे नावच आहे शांतीधाम, सुखधाम. आधी सुख असते, नंतर दुःख. बाबांनी समजावून सांगितले आहे, जे काही नवीन आत्मे वरून (शांतीधाम मधून) येतात, जसे क्राईस्टची आत्मा आली, त्यांना सुरुवातीला दुःख नसते. खेळ आहेच मुळी आधी सुख, नंतर दुःख. नवीन-नवीन जे येतात ते सतोप्रधान असतात. जसा तुमचा सुखाचा कालावधी जास्त आहे, तसाच बाकी सर्वांचा दुःखाचा कालावधी जास्त आहे. या सर्वामध्ये बुद्धीचा वापर केला जातो. बाबा आत्म्यांना बसून समजावून सांगत आहेत. ते मग दुसऱ्या आत्म्यांना समजावून सांगतात. बाबा म्हणतात - 'मी हे शरीर धारण केले आहे. अनेक जन्मांच्या अंताला अर्थात तमोप्रधान शरीरामध्ये मी प्रवेश करतो'. मग त्यांनाच (ब्रह्मा बाबांनाच) पहिल्या नंबर मध्ये जायचे आहे. फर्स्ट सो लास्ट, लास्ट सो फर्स्ट. हे देखील समजावून सांगावे लागते. मग पहिल्या नंबरच्या मागून कोण? मम्मा. तिचा पार्ट असायला हवा ना. तिने अनेकांना ज्ञान दिले आहे. त्या नंतर मग तुम्हा मुलांमध्ये नंबरवार आहेत जे अनेकांना ज्ञान देतात, शिकवतात. मग ते शिकणारे देखील असा प्रयत्न करतात की तुमच्यापेक्षाही वरची लेव्हल गाठतात. बऱ्याच सेंटर्सवर अशी मुले आहेत जी शिकवणाऱ्या निमित्त टीचर पेक्षा देखील पुढे निघून जातात. एकेकाला पाहिले जाते. सर्वांच्या वर्तनावरून माहित तर पडते ना. कोणाला तर माया अशी काही नाकाला पकडते की एकदम खलासच करून टाकते. विकारांमध्ये पडतात. पुढे जाऊन तुम्ही पुष्कळ जणांबद्दल ऐकत रहाल. आश्चर्य वाटेल, ही तर आम्हाला ज्ञान देत होती, मग ही कशी सोडून गेली. आम्हाला सांगत होती पवित्र बना आणि मग स्वतःच घाणेरडी (विकारी) बनली. समजणार तर जरूर ना. पुष्कळ जण घाणेरडे (विकारी) बनतात. बाबांनी सांगितले आहे मोठ्या-मोठ्या चांगल्या महारथींना सुद्धा माया जेरीस आणेल. जसे तुम्ही मायेला जेरीस आणून विजयी होता, माया देखील असेच करणार. बाबांनी किती चांगली-चांगली फर्स्ट क्लास, रमणिक नावे देखील ठेवली. परंतु अहो माया, आश्चर्यवत् सुनन्ती, कथन्ती, फिर भागन्ती... गिरन्ती झाले. माया किती प्रबळ आहे म्हणूनच मुलांनी खूप सावध रहायचे आहे. युद्धाचे मैदान आहे ना. माये सोबत तुमचे किती मोठे युद्ध आहे. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

1. १) इथेच सर्व हिशोब चुकते करून अर्ध्या कल्पासाठी सुख जमा करायचे आहे. या जुन्या दुनियेमध्ये आता मन लावायचे नाही. या डोळ्यांनी जे काही दिसते, ते सर्व विसरून जायचे आहे.
2. २) माया प्रचंड बलवान आहे, तिच्यापासून सावध रहायचे आहे. अभ्यासामध्ये घोडदौड करून पुढे जायचे आहे. एका बाबांकडूनच ऐकायचे आहे आणि त्यांच्याकडून ऐकलेलेच इतरांना ऐकवायचे आहे.

वरदान:- बेहदची दृष्टी, वृत्ती आणि स्थिती द्वारा सर्वांचे प्रिय बनणारे डबल लाईट फरिश्ता भव

फरिश्ते सर्वांनाच खूप प्रिय वाटतात कारण फरिश्ता सर्वांचा असतो, कोणा एका दोघांचा नाही.

बेहदची दृष्टी, वृत्ती आणि बेहदची स्थितीवाला फरिश्ता सर्व आत्म्यां प्रति परमात्म संदेश वाहक (दूत) आहे. फरिश्ता अर्थात डबल लाईट, सर्वांचे नाते एका बाबांसोबत जोडणारा, देह आणि देहाच्या संबंधांपासून न्यारा (वेगळा), स्वतःला आणि सर्वांनाच आपल्या आचरण आणि चेहऱ्याद्वारे बाप समान बनविणारा, सर्वांप्रती कल्याणकारी. असे फरिश्तेच सर्वांचे प्रिय आहेत.

बोधवाक्य:- जेव्हा तुमच्या चेहऱ्यामध्ये बाबांचे चरित्र दिसून येईल तेव्हाच समाप्ती होईल.

||| ओम शांती |||